**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 29-03-2022**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये कामठी ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-03-29 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2022-03-30 | 2022-03-31 | 2022-04-01 | 2022-04-02 | 2022-04-03 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 42.0 | 42.0 | 42.0 | 41.0 | 41.0 |
| किमान तापमान (अं.से) | 20.0 | 21.0 | 22.0 | 22.0 | 23.0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 39 | 40 | 38 | 42 | 40 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 33 | 32 | 31 | 32 | 35 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 7.0 | 6.0 | 6.0 | 6.0 | 9.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 337 | 256 | 140 | 140 | 108 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 1 | 1 | 2 | 2 | 2 |

## हवामान सारांश / चेतावणी:

कामठी तालुक्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्य वर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक३० मार्च २०२२ ते ०२ एप्रिल दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहण्याची शक्यता व हवामान कोरडे राहण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे.दिनांक ३० व ३१ मार्च २०२२ रोजी तुरळक (एक/दोन) ठिकाणी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

परिपक्व अवस्थेतील गहू, हरभरा, गहू, मोहरी, जवस इत्यादी पिकाची काढणी व मळणी ची कामे सकाळ व संध्याकाळच्या वेळी सुरु करावी तसेच तयार शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.फळबागा, भाजीपाला व उन्हाळी पिकांना गरजेनुसार हलके व वारंवार ओलीत करावे.उन्हाळी भुईमुग पिकामध्ये आऱ्या धरण्याच्या अवस्थेमध्ये आंतरमशागतीची कामे टाळावे.रब्बी हंगामातील पिकांच्या काढणी केलेल्या शेतांची नांगरणी करावी. मळणीची कामे शक्य नसल्यास काढणी केलेला शेतमाल प्लास्टिक शीटच्या सहाय्याने झाकून ठेवावा.पिक वाढीच्या नाजूक अवस्थामध्ये ओलिताची वारंवारता वाढवावी. शेतकरी व शेतमजूर बांधवांनी शेतातील कामे करतांना सकाळी किंवा संध्याकाळच्या वेळी प्राधान्य द्यावे. दुपारच्या वेळी प्रखर सूर्य प्रकाश असताना काम करणे टाळावे. शेतात कम करताना पुरेसे स्वच्छ व थंड पाणी प्यावे.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

उष्णतेपासून संरक्षणासाठी जनावरांना दुपारच्या वेळी चारावयास टाळावे. पिक वाढीच्या नाजूक अवस्थामध्ये ओलिताची वारंवारता वाढवावी.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|

